तारे उगवतांना बघणे

चित्र: डायन गुड

मराठी: अश्विनी बर्वे

आजीने मला सांगितले की, जेव्हा तिची आई लहान होती, तेव्हा तिचे केस माझ्यासारखेच लाल होते. प्रत्येक शुक्रवारी रात्री, भांडी आवरून झाल्यावर, आजीची आई तिच्या खोलीत येऊन तिला एक खास गोष्ट सांगायची.

ती गोष्ट खास होती. ती अमेरिकेच्या एका लांबच्या प्रवासाबद्दल होती. आणि एका लहान लाल केसांच्या मुलीबद्दल आणि तिच्या भावाबद्दल होती, जे एका अनोळखी, नवीन देशात आपल्या आई-वडिलांना भेटायला एकटेच जात होते.त्यात घडलेल्या काही गोष्टी दुःखद होत्या. पण काही गोष्टी तर जणू आकाशात तारे उगवताना पाहण्याइतक्याच अद्भुत होत्या.

ही गोष्ट एका अशा प्रेमळ कुटुंबाची आहे. जे कुटुंब स्नेह, विनोद आणि भूतकाळातील एका हळुवार भावनेने उजळून निघते—आणि या कहाणीला कॅल्डेकॉट ऑनर पुरस्कार विजेत्या चित्रकार डायन गुड यांच्या अत्यंत खास चित्रांची जोडही मिळाली आहे.

तारे उगवतांना बघणे

आजीने मला सांगितले की, तिची आई लहान असताना तिचे केस लाल होते—अगदी माझ्यासारखेच.

आजीच्या आईला लवकर झोपायला जायला आणि आकाशात तारे उगवताना बघायला खूप आवडायचे—अगदी माझ्यासारखेच.

प्रत्येक शुक्रवारी रात्री, भांडी आवरून झाल्यावर, आजीची आई तिच्या खोलीत येऊन तिला एक खास गोष्ट सांगायची.

मी लहान मुलगी असताना, मी आणि माझा मोठा भाऊ एका मोठ्या बोटीने अमेरिकेला गेलो होतो. आई, बाबा आणि बहीण तिथे आमची वाट पाहत होते. आईची बहीण, माझ्या मावशीने, आम्हाला बोटीपर्यंत नेले. तिने माझ्या दोन लहान भावांना आणले नाही. ते खूप लहान होते. ते मोठे झाल्यावर बोटीने येणार होते. मावशीने आम्हाला सुक्या फळांनी भरलेली एक टोपली दिली.

तिने एका वृद्ध स्त्रीला आमची काळजी घ्यायला सांगितले. आणि तिने ते केले. तिने आमची सुकी फळे सुद्धा खाल्ली.



ती म्हातारी बाई, भाऊ आणि मी आमच्या बोटीच्या पायऱ्या उतरून खाली गेलो. आम्ही आमची गाठोडी घेऊन खाली उतरत असताना मी पायऱ्या मोजत होते, पण त्या इतक्या जास्त होत्या की थोड्या वेळाने मी मोजायलाच विसरून गेले.



कधीकधी बोट पुढे-मागे हेलकावे खायची - त्यात मजा यायची! काही लोकांना ते आवडायचं नाही - त्यांना मळमळायची. ती म्हातारी बाई खूप, खूप आजारी पडली. तिचा मृत्यू झाला.भावाने मला काळजी करू नकोस असं सांगितलं. तो माझी काळजी घेईल, तो दहा वर्षांचा होता.



जेव्हा मी झोपायला गेले,
तेव्हा मला आकाश दिसत नव्हते.
त्यामुळे मला वाईट वाटले

दररोज सकाळी आम्ही उठल्यावर, भाऊ त्याच्या काठीवर एक खूण करायचा. मी त्या मोजल्या - तेवीस. शेवटच्या दिवशी सकाळी आम्ही पाण्यापलीकडे पाहिले. तिथे एकमेकांच्या जवळ दोन बेटे होती. त्यांपैकी एकावर एक मूर्ती उभी होती - मुकुट घातलेल्या एका स्त्रीची. सगळे खूप उत्साही झाले आणि त्यांनी तिला हात हलवला. मी सुद्धा तसेच केले.



जेव्हा बोट थांबली, तेव्हा आम्ही आमची गाठोडी फळीवरून खाली घेऊन गेलो. मी रडू लागले, मला आई, बाबा आणि बहीण दिसत नव्हते. एका खलाशाने मला सांगितले की काळजी करू नकोस, आपण त्यांना लवकरच भेटू. आम्ही दुसऱ्या बोटीने एका बेटावरील ठिकाणी गेलो.



आम्ही आमची गाठोडी एका खूप मोठ्या खोलीत घेऊन गेलो. मी आणि भाऊ, आई-बाबा नसलेल्या इतर मुलांसोबत एका लहान खोलीत गेलो.एक बाई माझ्याकडे निरखून बघत होती. मला आश्चर्य वाटले, का? मी भावाची वाट बघत होते. ती बाई त्याच्याकडेही बघत होती.



दुसऱ्या दिवशी आम्ही फेरीने गेलो. जसजसे आम्ही पाहत होतो, तसतशी जमीन जवळ येत होती. सगळ्यांनी हात हलवला. आम्हीही तसेच केले.





आई, बाबा आणि बहीण तिथे होते!

आम्ही ट्रॉलीने आमच्या घरी गेलो.
आई म्हणाली की तो एक महाल आहे.
आईचा महाल सर्वात वरच्या मजल्यावर
होता. आम्ही वर चढत असताना मी
पायऱ्या मोजल्या - बावन्न!

आई आणि बाबांची खोली मधोमध होती. आमची खोली पुढे होती. आणि मागे स्वयंपाकघर होत, ज्यात एक मोठा काळा स्टोव्ह होता. आईने स्टोव्हवर एका मोठ्या पातेल्यात पाणी गरम केलं. तिने त्यातलं थोडं पाणी बादलीत ओतलं आणि मला हातपाय धुवायला मदत केली.

आईने माझे केस धुतले आणि ते सुकल्यावर तिने ते विंचरले. खूप छान वाटले. बहिणीने आम्हाला बिस्किटे आणि चहाचे ग्लास दिले.

मी खूप थकले होते. मी आई आणि
बहिणीला शुभरात्रीचा पापा दिला
बाबांनी माझ्या डोक्यावर थोपटले आणि
म्हणाले की मी त्यांची छोटी राजकुमारी
आहे.मी आमच्या खोलीत गेले आणि
बहिणीच्या पलंगावर चढले. तो अगदी
खिडकीला लागून होता. मी तारे
उगवताना पाहिले. एक, दोन, तीन.



या शुक्रवारी रात्री मी खूप लवकर
झोपून आकाशात तारे उगवताना
पाहीन. मला आशा आहे की आजी
माझ्या खोलीत येईल आणि मला
आणखी एक खास गोष्ट सांगेल.

समाप्त